# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०६/०८/२०२४ (मंगळवार) सायंकाळ

---

### 'श्री जी ब्लॉक प्रायव्हेट लिमीटेड' ग्राम झुल्लर येथील दुर्घटने संबंधाने कार्यवाही

दि. ०६/०८/२०२४ चे ०४.१५ वा. पोलीस ठाणे मौदा येथे ग्राम झुल्लर येथील पोलीस पाटील श्रीमती अपर्णा वानखेडे यांनी फोनद्वारे संपर्क करून माहिती दिली की, श्री जी ब्लॉक प्रा. लि. झुल्लर या कंपनी मध्ये पहाटे ०३.३० वा चे सुमारास ब्लास्ट झालेला आहे व कारखान्यामध्ये काम करीत असलेले कामगार जखमी झालेले आहे. अशी माहिती प्राप्त होताच पोलीस ठाणे मौदा येथील प्रभारी अधिकारी सतिशसिंह राजपूत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सपोनि मनोज चौधरी, पोउपनि बोथले, डी.बी. पथक व पोलीस स्टाफ तात्काळ घटनास्थळी हजर झाले. तसेच तात्काळ कंपनीतील इतर कामगारांच्या व स्थानिक नागरिकांच्या मदतीने सदर दुर्घटनेत जखमी असलेले ९ कामगार यांना पुढील उपचाराकरिता नागपूर येथे पाठविण्यात आले. तसेच दुर्घटनेत नंदकिशोर रामकृष्ण करंडे, वय ३५ वर्षे, रा. डुभरीकला, तालुका–पारशिवनी, जिल्हा नागपुर हे मयत झाल्याचे दिसून आले. जखमी कामगार उपचार कामी दाखल असलेले रूग्णालयामध्ये पोलीस स्टाफ रवाना करण्यात आले.

दुर्घटनेबाबत माहिती घेतली असता श्री जी ब्लॉक प्रा.लि. कंपनी झुल्लर या कंपनी मध्ये AAC (Auto clave Ariated concreet) या ब्लॉक मध्ये राखे पासून विटा तयार करण्याचे उत्पादन केले जाते. ज्यामध्ये कच्च्या विटा तयार झाल्यानंतर त्या परिपक्व करण्या करिता Auto clave या यंत्रामध्ये ठेवण्यात येतात. ज्यामध्ये वाफ भरलेली असते. घटनेवेळी सदर कंपनीमध्ये कार्यरत Auto clave कमांक ३ याचा ब्लास्ट होउन दुर्घटना घडून आली व ज्यामध्ये वरील मयत इसम व त्यासोबत १) ब्रम्हानंद रामाजी मानेगुडधे वय ४५ वर्षे रा. रानमांगली ता. मौदा, जि. नागपुर तसेच (२) हुसैन बशीर, सय्यद वय २४ वर्षे, रा. वडोदा ता. कामठी, जि. नागपुर (३) सुरेन्द्र किसनजी उमग वय ४० वर्षे रा. झुल्लर ता. मौदा जिल्हा नागपुर, (४) स्वप्निल नारायण सोनकर वय १९ वर्षे, रा. वडोदा, तालुका कामठी, जिल्हा – नागपुर, (५) कुवरलाल पुनाजी भगत वय ५५ वर्षे, रा. वडोदा, तालुका कामठी, जिल्हा नागपुर, (६) वंश विष्णुजी वानखेडे वय २० वर्षे रा.झुल्लर तालुका मौदा, जिल्हा नागपुर, (७) गुणवंत दौलतराव गजभिये वय ४६ वर्षे, रा. वडोदा, ता. कामठी, जिल्हा नागपूर (८) रामकृष्ण मनोहर विभुते वय ४५ वर्षे, रा. वडोदा, तालुका कामठी, जिल्हा नगपुर, ९) कालीचरण उर्फ कल्लु उमेदा शाहु वय ३५ वर्षे रा. वडोदा, ता. कामठी, जिज्हा नागपुर हे कामगार जखमी झालेले आहेत. व त्यांचा सद्यास्थितीत सेवन स्टार हॉस्पीटल नागपूर येथे उपचार सुरू असून योग्य तो समन्वय सुरू आहे.

श्री जी ब्लॉक प्रा.लि. कंपनी झुल्लर येथे दि. ०६/०८/२०२४ चे पहाटे अंदाजे ०३.१५ वा. ते ०३.३० वा चे सुमारास Auto clave Ariated concreet या ब्लॉक मधील Auto clave या यंत्रामध्ये झालेल्या ब्लास्ट तथा दुर्घटना संबंधाने संबंधीत कंपनीचे मालक (१) व्ही उर्फ वियरू भास्कर राव, (२) चंद्रकांत भगवानदास भदानी (३) महेश नारायणदास पटेल (४) प्लांट मॅनेजर नागाअर्जुन जस्ती, सर्व राहणार नागपुर यांचेवरती फिर्यादी महेश भिमराव बनसोड वय ३० वर्ष रा. आंबाडी जि. नागपूर यांचे तक्रारी वरून पोलीस ठाणे मौदा येथे अप. क्र. ७४८/२०२४ कलम

१०६(१), १२५(A), १२५(B), २८९ भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून पुढील तपास पोनि राजपूत साहेब करीत आहेत. घटनास्थळी पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकारी यांनी भेट दिलेली आहे.

## पो.स्टे. एमआयडीसी बोरी हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड

## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक ०५/०८/२०२४ रोजी पोस्टे एमआयडीसी बोरी येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हद्दीतील सुकळी बेलदार येथील अब्दुल शेख यांचे किरायाचे मकानाचे बाजूला असलेल्या सार्वजनिक ठिकाणी मोकळया जागेत काही लोक ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पोस्टे एमआयडीसी बोरी येथील स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर स्टाफ यांनी सुकळी बेलदार येथील अब्दुल शेख यांचे किरायाचे मकानाचे बाजूला असलेल्या मोकळया जागेत सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— १) शुभम प्रकाशराव देशमुख रा. वार्ड क्र. ५ सुकळी २) रोहित माणिकराव धारोरकर रा. वार्ड क्र. ६ ३) करण जयसिंग मोहिते रा वार्ड नं. ६ ४) अमोल रामप्रसाद पटले रा. वार्ड नं. ६ चारही रा. सुकळी बेलदार एमआयडीसी बोरी** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०४ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन १) एक लाल रंगाची निळे पट्टे असलेली प्लास्टिकची चटई २) ५२ तास पत्ते ३) नगदी ५२००/— रू चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे एमआयडीसी बोरी येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे एमआयडीसी बोरी येथील ठाणेदार सपोनि राजीव कर्मलवार, पोउपनि खोत, पोना श्रीकांत गौरकर यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर